माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १५६१/२०२१**

**अपिलार्थी, श्री. संजय रमेश बघेले,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
तहसिल कार्यालय गोरेंगाव, ता. गोरेगांव जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
गोरेगांव ता. गोरेगांव जि. गोंदिया

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०३.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०१.२०२१ | निरंक | ०५.०३.२०२१ | २५.०३.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २९.०१.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "१)उपरोक्त विषयांकीत पत्र आपले कार्यालयात प्राप्त झाले असल्यास त्या आवक नोंद रजिष्टरच्या पानाची सत्यप्रत २) विषयांकीत पत्रात नमुद तहसिलदार नायब तहसिलदार यांनी आपले स्वयंस्पष्ट अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास न चुकता सादर करावे, त्या स्वयंस्पष्ट अहवालाची संपूर्ण सत्यप्रतीत माहिती. ३) तहसिलदार, नायब तहसिलदार गोरेगाव यांनी स्वयंस्पष्ट अहवाल सादर केले नसल्यास त्यासंबंधात वरीष्ठांचे आदेश पत्राची संपूर्ण सविस्तर सत्यप्रतीत माहिती देण्यात यावी " इत्यादी एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०५.०३.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती न पुरविल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०३.२०२१ रोजी सूनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा प्रस्तूतकार-१ तहसिल कार्यालय, गोरेगाव यांनी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती विनामुल्य टपालाव्दारे पुरविण्यात यावी, तसेच आदेश

मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत वस्तुस्थितीबाबत कळविण्यात यावे, असे आदेशीत करुन अपिल निकाली काढण्यात येते.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २३.०७.२०२१ रोजी** "जन माहिती अधिकारी यांनी आजपावेतो माहिती पुरविली नसल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे.सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २८.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय गोरेगांव श्री. एस.एस. कांबळे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचेतर्फे नायब तहसिलदार श्री. एस.एस. कांबळे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, यात नमुद केलेल्या विषयात अर्थबोध होत नसल्यामुळे तसेच वरील अर्ज हा कोरोना कालावधीत दाखल केला असल्यामुळे कुठलीच माहिती अभिलेख स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस तसे कळविण्यात आले. त्याविरुध्द दाखल प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे प्रथम अपील अर्ज सादर करण्यात आला. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी सुनावणी दरम्यान, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र अ नुसार ज्या पत्राची माहिती मागितलेली आहे त्या पत्राची प्रत दिसत नसल्याचे सुनावणी दरम्यान नमुद केले आहे. मात्र ही वस्तुस्थिती त्या अपिलार्थींना कळविण्यात आली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रस्तुतकार १ तहसिल कार्यालय गोरगांव यांनी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती विनामुल्य टपालाव्दारे पुरविण्यात यावी, असे सुचित केले. तसेच आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत वस्तुस्थितीबाबत कळविण्यात यावे, असे सुचित केले. त्याप्रमाणे दिनांक २७.०३.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रस्तुतकार १ तहसिल कार्यालय गोरगांव यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडे जोडपत्र अ मधिल मागितलेल्या माहितीमध्ये मा. जिल्हाधिकारी यांचे दिनांक २३.०६.२०२० च्या पत्राच्या अनुषंगाने माहिती मिळावी असे नमुद केले आहे. तरी सदर पत्रास शोध घेण्यास उशिर लागत असल्यामुळे नेमकी कुठली माहिती अपेक्षित आहे याचा अर्थबोध होत नसल्याचे सुचित करीत याबाबत स्पष्टपणे कळविण्याचे सहकार्य करावे जेणेकरुन सदर माहिती लवकरात लवकर पुरविणे शक्य होईल. मात्र यावर अपिलार्थी यांच्याकडून कुठलेच सहकार्य प्राप्त झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आज सुचित केले. अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जात माहिती

उपलब्ध नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुन:श्च एकदा अभिलेखागारात दिनांक २३.०६.२०२० च्या मा. जिल्हाधिकारी यांच्या पत्राच्या अनुषंगाने तपास घेवून वरील माहिती जर दस्ताऐवज स्वरुपात उपलब्ध असल्यास अपिलार्थी यांना प्रदान करावी, अन्यथा माहिती निरंक असे सुस्पष्ट कळवावे, माहिती असल्यास अपिलार्थीस २ आठवड्याच्या आत प्रदान करावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
★नागपूर★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०३.२०२३**

जावक क्रमांक 6826 दिनांक 23 NOV 2023